# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १०.०६.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०९.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून १,४९,९७,३५७/—रू. चा मुद्द्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून १,६५०/—रू. चा मुद्द्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३५१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,९२,७५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सोनेगाव :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०९.०६.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, सोनेगाव पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, आमराई परिसरात एक हद्दपार ईसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आमराई परिसर, हनुमान मंदीराजवळ गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनचा ईसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दुर्योधन उर्फ रोहन मनोहर वर्मा वय २५ वर्षे रा. धनरगरपूरा, सावरकर नगर चौक, बजाजनगर, नागपूर असे सांगीतले. त्यास विचारपुस करुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. विकास टोंग यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. शेषराव येलेकर यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.०६.२०२६ चे १२.३० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी सौ. बेबी गणेश देहारे वय ५७ वर्ष रा. प्रभाग १, सृष्टी सोसायटी, बुटीबोरी, नागपूर हया त्यांचे आईला भेटण्याकरीता मानेवाडा चौक येथे जायचे असल्याने बुटीबोरी येथून बसने छत्रपती चौकात उतरल्या. तेथून ऑटोरिक्शाने मानेवाडाकडे जात

असता, फिर्यादीचे आधी ऑटोरिक्शामध्ये बसलेल्या चार महिला यांनी पोलीस ठाणे अजनी हद्दीत, छत्रपती चौक ते मानेवाडा दरम्यान फिर्यादीची नजर चूकवून फिर्यादीचे बॅगेत असलेली छोटी पर्स, ज्यामध्ये सोन्याचे मंगळसुत्र, गोफ व माळ असा एकुण किंमती १,४७,७७१/—रू. चा मुद्देमाल असलेली, चोरून नेली. फिर्यादी या ऑटोरिक्शामधून उतरताच छोटी पर्स चोरी झाल्याचे त्यांचे लक्षात आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. आगासे ८४४६२८३९२५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे यशोधरानगर :— जिवे ठार मारणाऱ्या ०२ आरोपींना अटक.</u>**

पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, टिपु सुलतान चौक समोर, शिवाजी चौक रोडवर फिर्यादीचे टाईमपास झोन नावाचे कॅफे शॉप आहे. दिनांक ०९.०६.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे कॅफेशॉप बाहेर रोडवर फिर्यादीचा मित्र नामे मोहम्मद सलमान मोहम्मद अशफाक वय २२ वर्ष रा. संघर्षनगर, नागपूर हा मोबाईलवर बोलत उभा असतांना, आरोपी मुजम्मील उर्फ मुज्जु हसन अली वय २० वर्ष रा. गांजाखेत, नागपूर याने त्याचा साथीदार नामे साहील मलिक वय १९ वर्ष रा. चारखंबा, पाचपावली नागपूर याचेसोबत मोटार सायकलवरुन येऊन जुने भांडणाचे कारणावरुन संगनमत करुन मोहम्मद सलमान यास जिवानिशी ठार करण्याचे उद्येशाने चाकू सारखे शस्त्राने छातीवर, खांद्यावर, हातावर वार करुन गंभीर जखमी केले. फिर्यादी व मित्रांनी जखमी यास उपचाराकरीता होप हॉस्पिटल व तेथून मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी मोहम्मद सलमान यास तपासून मृत घोषित केले.

यापकरणी फिर्यादी मोहम्मद शोयेब मोहम्मद शरीफ अंसारी वय २४ वर्षे, रा. प्लॉट क्र. ११३४, पांडेची वस्ती, यशोधरानगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि सुरेश बुंदे ८९९९६९४०१३ आरोपीं विरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन त्वरीत दखल घेऊन आरोपींचा शोध घेऊन दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कोराडी</u>** :— दिनांक ०९.०६.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, गायमुख, कोराडी मंदीरमागे, भक्त निवासचे समोर, नवीन पुलावरुन खाली पडल्याने तलावाचे चिखलात एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे, रंग—सावळा, उंची— ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस काळे व साधे, दाढी—थोडीशी वाढलेली, अंगात—हिरव्या रंगाचा टिशर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले व उजवे हातात पांढरे धातुचा कडा असलेल्या वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले, त्यांना बाहेर काढून उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कोराडी येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी ओमबहादुर जितबहादुर थापा वय ५८ वर्ष रा. गायमुख, खापरी रोड, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. क्रांती पवार ८६००९७५६६६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे कोराडी</u>** :— प्रियंका राजकुमार यादव वय २५ वर्षे रा. चावल अंगणवाडी समोर, बुध्द विहारमागे, स्मृती नगर, बोखारा, नागपूर ह्या दिनांक ०४.०६.२०२६ चे ०३.३० वा. कु. साधना वीर यादव वय १२ वर्ष हिचेसह पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन

गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन प्रियंका,** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट, केस–काळे साधारण, अंगात– सलवार कुर्ता घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. साधना वर्णन– **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट ४ इंच, केस–काळे साधारण, अंगात– हिरवा कुर्ता व जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी बोलते.


प्रियंका


साधना

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**गुन्हे शाखा पोलीसांनी दि. ०६/०६/२०२६ ते १०/०६/२०२६ दरम्यान एकत्रित केलेली कामगिरी :–**

मा. श्री डॉ. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, श्री मा. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त(डिटेक्शन), श्री अभिजीत पाटील, सपोआ, गुन्हे, नागपूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा अंतर्गत विविध युनिट/पथक यांनी दि. ०६/०६/२०२६ ते दि. १०/०६/२०२६ दरम्यान नागपूर शहरातील विविध पोलीस ठाणे हद्दीत विशेष मोहिम राबवून अवैध दारू विक्री, वाहन चोरी, मोबाईल चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मादक/अंमली पदार्थ सेवन तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई केली. गुन्हयातील सर्व आरोपी, जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आली.

## प्रमुख कारवाईचा तपशील

| अ. क्र. | युनिट/पथक | कारवाईचा प्रकार | कारवाई संख्या | आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|---|---|
| १ | युनिट क्र. ०१ | दारूबंदी कायदा, हातभट्टी दारू, आरोपी चेकिंग | ०३ | ०७ | १,५२,१०० |
| २ | युनिट क्र. ०२ | जुगार/ऑनलाईन लॉटरी, आर्म्स ॲक्ट, NDPS, COTPA | ०६ | १४ | ५,६०,५१० |
| ३ | युनिट क्र. ०३ | दारूबंदी, जुगार, आर्म्स ॲक्ट, NDPS, सुपारी कारवाई | ०८ | १३ | ८०,५६५ |
| ४ | युनिट क्र. ०४ | अत्यावश्यक वस्तू | २ | २ | ८५,५५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अधिनियम, । | | | |
| ५ | युनिट क्र. ०५ | वाहन/मोबाईल चोरी, दारूबंदी कारवाई | ०३ | ०६ | १,७०,९५० |
| ६ | युनिट क्र. ०६ | दारूबंदी कारवाई, आरोपी चेकिंग | ०३ | ०३ | ११,४८० |
| ७ | सामाजिक सुरक्षा विभाग | NDPS Act | ०१ | ०२ | १,४९,७९,८३७ |
| ८ | वाहन चोरी | वाहन चोरी उघडकीस, दारूबंदी कारवाई | ०३ | ०३ | १,७०,२३० |
| ९ | घरफोडी विरोधी | घरफोडी/वाहन चोरी | ०२ | ०२ | ९०,००० |
| १० | अंमली पदार्थ | MD (मेफेड्रोन) जप्त | ०१ | ०२ | ९,०४,००० |
| ११ | खंडणी विरोधी | दारूबंदी कारवाई | ०१ | ०१ | २००० |
| १२ | सोनसाखळी | — | — | — | — |
| **एकुण** | | | **३१** | **४१** | **३,६९,०४,२२२** |

सामाजिक सुरक्षा विभाग

— १५०.५२० कि.ग्रॅ. गांजा, ०१ ट्रक, २९.२६० टन स्टील कॉईल जप्त

— १.४९ कोटींपेक्षा जास्त मुद्देमाल

अंमली पदार्थ विरोधी पथक

— ५२ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन), ०३ मोबाईल, ०१ मोपेड जप्त

— ९,०४,०००/— मुद्देमाल

घरफोडी विरोधी पथक

— ०२ गुन्हे उघडकीस, ०२ आरोपी अटक

— चोरीची दुचाकी हस्तगत

वाहन चोरी विरोधी पथक

— वाहन चोरीचे गुन्हे उघड

— दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई

एकूण कारवाया — ३१
आरोपींविरुद्ध कारवाई — ४१
आरोपी तपासणी — ५६
मिळून आलेले आरोपी — १९
NDPS कारवाया — ०६
दारूबंदी कारवाया — १७
जुगार/ऑनलाईन लॉटरी — ०३
आर्म्स ॲक्ट — ०२
COTPA कारवाई — ०१
अत्यावश्यक वस्तू अधिनियम — ०१
घरफोडी, वाहन चोरी गुन्हे उघड — ०५
एकूण जप्त मुद्देमाल — **३,६९,०४,२२२/— (अंदाजे ३.६९/— कोटी)**